राशन कार्ड साईड बंद! नागरिकांना कार्यालयाच्या माराव्या लागत आहे फेऱ्या >>पान 2

जिल्हा ग्रंथालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमाचे उद्घाटन >>पान 3

विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक घडविण्यासाठी विज्ञान प्रदर्शनाची गरज - आमदार सिद्धार्थ खरात >>पान 4

**सुविचार**

सौम्य शब्दांनी कठोर ह्रदयं देखील जिंकता येतात.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



खोटं बोलून, माझ्या नावाने बिझनेस करु नका' अंकिता वालावलकर संतापली

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 142 ■ शुक्रवार, दि. 03 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रशंसा

**दैनिक आपला विदर्भ**

**दुर्गम, नक्षलग्रस्त भागाच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र विविध स्तरांवर प्रयत्नशील**

**गडचिरोलीसह परिसरातील नागरिकांचे प्रधानमंत्र्यांकडून अभिनंदन**

**मुंबई/गडचिरोली/प्रतिनिधी** दि. २ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या दुर्गम आणि नक्षलग्रस्त भागाच्या सर्वांगीण विकासासाठी करण्यात येत असलेल्या विविध प्रयत्नांची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रशंसा केली आहे. नववर्षाच्या प्रारंभी मुख्यमंत्री फडणवीस यांनी केलेला गडचिरोली दौरा हा येथील नागरिकांच्या आयुष्यात सुख-समाधान आणण्यासह सकारात्मक बदल घडवून आणेल, असा विश्र्वास प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी 'एक्स'च्या माध्यमातून व्यक्त केला आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवीन वर्षाच्या प्रारंभी गडचिरोली जिल्ह्याचा दौरा केला. या दौऱ्यात मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी विविध विकासकामांची सुरूवात करतानाच सामाजिक सलोखा आणि शांतता अबाधित रहावी यासाठी आपला संकल्प जाहीर केला. गडचिरोली यापुढे महाराष्ट्रातील शेवटचा जिल्हा राहणार नसून तो पहिला जिल्हा ठरण्यासाठी प्रयत्न करण्याबरोबरच, याठिकाणी सुरू असलेल्या औद्योगिकीकरणामुळे इथल्या नागरिकांना अत्याधुनिक पायाभूत सुविधा मिळतील, अशी ग्वाही यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिली.

गडचिरोलीच्या विकासासाठी राज्य शासनाने घेतलेला पुढाकार आणि त्यास मिळत असलेल्या नागरिकांच्या प्रतिसादाबद्दल प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी गडचिरोली आणि परिसरातील नागरिकांचे विशेष अभिनंदन केले आहे. महाराष्ट्र शासन राबवित असलेले विविध उपक्रम, योजना, अभियान यामुळे राज्याच्या प्रगतीचा मार्ग आणखी प्रशस्त होईल, असा विश्र्वास प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी आपल्या 'एक्स' या समाजमाध्यमावर व्यक्त केला आहे.

**प्रधानमंत्र्यांच्या नेतृत्वात गडचिरोली नक्षलमुक्त करण्यासह नागरिकांना मुख्य प्रवाहात आणणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा पाठिंबा आणि मार्गदर्शन यामुळेच गडचिरोलीसारख्या दुर्गम आणि आदिवासी भागांच्या विकासासाठी अथक प्रयत्न करण्याची प्रेरणा मिळत असल्याचे आपल्या 'एक्स' या समाजमाध्यमावर नमूद केले आहे. प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या नेतृत्वात गडचिरोली नक्षलमुक्त करून आदिवासी बांधवांचे जल, जमीन आणि जंगल हे हक्क अबाधित ठेवत त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात येईल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी गडचिरोली जिल्ह्याचा दौरा केला. त्यांच्या उपस्थितीत जहाल नक्षली ताराक्कासह ११ नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली. देशाच्या स्वातंत्र्यानंतर ७७ वर्षांत प्रथमच अहेरी ते गर्देवाडा या बससेवेचा त्यांनी शुभारंभ केला. या बसमधून त्यांनी प्रवासही केला. लॉईडच्या विविध उपक्रमांचा त्यांनी शुभारंभ केला. यातून ६ हजार २०० कोटींची गुंतवणूक होत असून, चार हजारावर रोजगारनिर्मिती होत आहे. गट्टा-गर्देवाडा-वांगेतुरी मार्ग तसेच ताडगुडा पुलाचे श्री. फडणवीस यांनी लोकार्पण केले. पेनगुंडा येथे जवानांशी आणि ग्रामस्थांशी त्यांनी संवाद साधला. या भागात जाणारे ते पहिलेच मुख्यमंत्री ठरले आहेत. गडचिरोली जिल्ह्याची ही विकासयात्रा यापुढेही सुरू राहील, असा विश्र्वास श्री. फडणवीस यांनी येथील नागरिकांना दिला.

# मेडिकल कॉलेज हतेडीत नको बुलढाण्यातच व्हावे

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय कृती समितीची केंद्रीय राज्य मंत्र्यांकडे मागणी

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाने बुलढाणा येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर केले आहे. २०२४-२५ पासून हे महाविद्यालय बुलढाणा येथे सुरु झाले आहे. परंतु शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हे हतेडी बु. येथे करण्याचे प्रस्तावित आहेत. प्रत्यक्षात हे गाव बुलढाण्यापासून दूर आहे त्यामुळे रुग्ण, विद्यार्थ्यांना गैरसोयीचे होणार आहे. हे महाविद्यालय बुलढाण्यात आहे आणि जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी आहे. बुलढाणा येथे आवश्यक असणाऱ्या भौतिक सोईसुविधा, जागा, इमारत इत्यादी गोष्टी उपलब्ध आहेत. शासकीय महाविद्यालयासाठी आवश्यक असणारी बेडची संख्या उपलब्ध आहे. शासनाने नेमलेल्या अध्यास समितीने सुद्धा बुलढाणा येथेच हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय होण्यास उपयुक्त ठिकाण आहे असे नमूद केले आहे. हतेडी हे ठिकाण सर्व दृष्टीने गैरसोईचे असल्यामुळे रुग्णांना त्रास होईल व रुग्णांचा वेळा वाया जाईल. बुलढाणा येथे शासकीय



वैद्यकीय महाविद्यालय झाल्यास शासनाचा इमारतीवर होणारा मोठा खर्च वाचू शकतो तरी, जिल्ह्यातील सर्व जनताहरण व विद्यार्थी यांच्या वतीने प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय बुलढाणा येथेच व्हावे अशी मागणी बुलढाणा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय कृती समितीच्या वतीने आज केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्याकडे करण्यात आली आहे. तसेच आपल्या मागण्यांचे निवेदन सुद्धा त्यांनी जिल्हाधिकारी यांना सुद्धा दिले आहे.

# नागपुरात कपिल नगर पोलीस स्टेशन हद्दीत मुलानेच केली जन्मदात्या आई वडिलांची हत्या

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपुरातील कपिल नगर पोलीस स्टेशन हद्दीत आई वडिलांची मुलानेच हत्या केल्याची घटना घडली आहे. काल सकाळी एका घरात पती-पत्नीचे मृतदेह आढळून आले.



लिलाधर डाखुळे आणि अरुणा डाखुळे अशी मृत पती-पत्नीची नावे आहेत. त्यांचा २५ वर्षीय मुलगा उत्कर्ष डाखुळे याची पोलिसांनी चौकशी केली असता त्याने कबुल केले की त्यानेच त्याच्या आई-वडिलांची हत्या केली. २६ डिसेंबरला त्याने आधी गळा दाबून आईची हत्या केली त्यानंतर वडील घरी आल्यानंतर त्यांना चाकूने मारले. आता पर्यंतच्या तपासात कारण पुढे आलं की तो ६ वर्षापासून इंजिनीअरिंग करत होता मात्र त्याचे पेपर बॅकलॉक राहत होते म्हणून आई वडील त्याला दुसरं काही करण्याचा सल्ला देत होते त्याचा राग त्याच्या मनात होता आणि त्यातून त्याने त्यांची हत्या केली. बहिणीला तो कॉलेज मधून घरी न नेता त्याच्या काकांकडे घेऊन गेला व आई बाबा मेडिटेशनसाठी बँगलोरला गेल्याचे सांगितले. या प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.

# अवैध धंदे चालू दिले नाहीत तर मस्साजोग सारखा सरपंच करेन

**अवैधधंद्यांना विरोध करतो म्हणून सरपंचपतीला धमकी**

**१ लाख २७ हजाराचा चा ऐवज लुटला**

**धमकी देणाऱ्या पाच आरोपींवर गुन्हा दाखल..**

**दैनिक आपला विदर्भ**


**जानेफळ/प्रतिनिधी :** 'तू माझ्या अवैध धंद्याला विरोध करशील तर तुझा दुसरा मस्साजोगचा सरपंच संतोष देशमुख करून टाकीन' , अशी धमकी देत कलंबेश्र्वर येथील सरपंच पतीचा गळा आवळून सोबतच्या तिघांनी मारहाण करत खिशातील नगदी पैसे आणि सोन्याचे दागिने असे मिळून एकूण १ लाख २७ हजार रुपयांचा ऐवज जबरीने हिसकावून नेल्याची तक्रार मेहकर तालुक्यातील कळंबेश्र्वर येथील सरपंच पती सुभाष मनोहर खुरद यांनी जानेफळ पोलीस स्टेशनला दिलीय .. सरपंच पती सुभाष खुरद यांनी गावातील अवैध धंद्यांना आळा घालण्याचा प्रयत्न करीत असल्याने गावातीलच चिडलेल्या अवैध धंदे वाल्यांनी रस्त्यात अडवून सरपंच पती सुभाष खुरद यांचेवर प्राणघातक हल्ला केलाय .. याप्रकरणी सुभाष खुरद यांनी जानेफळ पोलिसांत दिलेल्या तक्रारीवरून अवैध व्यवसाय करणारे आरोपी गणेश भराड, आकाश, सपकाळ सह इतर ३ आरोपी, अशा पाच आरोपींवर कलम ३०९ (२), ११५(२) ३५२, ३५१(२), ३५१ (३) ३(५) BNS -२०२३ प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ..




# राशन कार्ड साईड बंद! नागरिकांना कार्यालयाच्या माराव्या लागत आहे फेऱ्या

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी** :देशातील प्रत्येक कुटुंबातल्या प्रत्येक सदस्याचे एक महत्त्वाचे दस्तावेज म्हणजे राशन कार्ड हे होय. काही वेळा राशन कार्ड मध्ये छोटे-मोठे बदल करायचे असतात. जसे की, मृत व्यक्तीचे व लग्न झालेल्या मुलीचे नाव कमी करणे, नवीन जन्म झालेल्या बाळांचे नाव समाविष्ट करणे, पत्ता बदलणे, किंवा नवीन राशन कार्ड काढणे यासाठी सर्वसामान्य माणसांना तहसील कार्यलयात यावे लागते. पण पंधरा दिवसापासून साईड बंद असल्यामुळे तहसील कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत आहे. तहसील कार्यालयाच्या अन्न पुरवठा विभागाच्या भिंतीवर साईड बंद असल्याची सूचना फलक चिपकवली असून त्यात दोन ते तीन दिवसचा कालावधी दिला होता. तेव्हा पासून आतापर्यंत लावलेल्या सूचनाला अंदाजे पंधरा दिवसाचा कालावधी होऊन सुद्धा साईड चालू नाही झाल्यामुळे नागरिकांना तीन दिवस वगळता दररोज तहसील कार्यालयाच्या अन्न पुरवठा कार्यलयात चकरा मारावे लागत आहे.आपली रोज मजुरी बुडवून तहसील कार्यलयात वारंवार यावे लागत असल्याने नागरिक त्रस्त झाले असून आतापर्यंत साईड का चालू केली नाही? म्हणून प्रश्न करताना दिसत आहे. यावर तहसीलदार, तालुका पुरवठा निरीक्षक व जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी लवकर उपाय करून नागरिकांना होणाऱ्या त्रासापासून मुक्त करावे असे नागरिकांतून बोलल्या जात आहे.




वरून काही तांत्रिक बिघाड झाल्यामुळे राशन कार्ड साईड बंद आहे.आम्ही याबद्दल वरिष्ठ अधिकारी यांना पत्र व्यवहार करून त्याना कळवले आहे.तांत्रिक बिघाडावर काम चालू असून लवकरात लवकर सुरु करण्याचा आमचा प्रयत्न चालू आहे.

**-अमोल महाजन**
**तालुका पुरवठा निरीक्षक**

## स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या सावित्रीबाई फुले

महाराष्ट्रातील पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले यांची आज म्हणजे ३ जानेवारी २०२३ रोजी १९४ वि जयंती. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी साताऱ्याजवळील नायगाव या गावी झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई तर वडिलांचे नाव खंडूजी नेवसे असे होते. त्यांचे वडील गावचे पाटील होते. ज्या काळात स्त्रियांना घराच्या बाहेर पडायचे बंधन होते, त्याकाळात सावित्रीबाईंचा जन्म झाला. असे असले तरी सावित्रीबाई मात्र निडर स्वभावाच्या होत्या. त्या लहान असतांना एका दुबळ्या मुलाचे फुले पळवणाऱ्या धटिंगणाला त्यांनी अद्दल घडवली होती तसेच त्यांच्या घरासमोरील झाडावर असणाऱ्या घरट्यातील पक्षांची अंडी खाणाऱ्या नागाला त्यांनी ठेचून मारले होते. वयाच्या नवव्या वर्षी त्यांचा विवाह महात्मा जोतीराव फुले यांच्याशी झाला. जोतीराव तेंव्हा तेरा वर्षाचे होते. त्याकाळी बालविवाहाची परंपरा होती, अगदी पाळण्यात देखील विवाह लावले जायचे. महात्मा जोतीराव फुले म्हणजे महाराष्ट्रातील आद्य समाजसुधारक. जोतीरावांना मातृप्रेम लाभले नाही. त्यांच्या मावस भगिनी सगुणा यांनी त्यांचा सांभाळ केला. सगुणा इंग्रज अधिकाऱ्याकडे दाई म्हणून काम करायच्या त्यामुळे त्यांना इंग्रजी कळायचे. आपल्या जोतीरावने देखील इंग्रजी फाडफाड बोलले पाहिजे असे त्यांना वाटायचे. त्यांनी जोतीरावांना शिकण्यास प्रेरित केले. जोतीरावही शिकले नंतर जोतिरावांनी सावित्रीबाई यांनाही शिकवले. मुलींच्या शिक्षणाचे महत्व जाणून मुलींसाठी शाळा काढण्याचा निर्णय त्यांनी घेतला. ते नेहमी म्हणत एक मुलगी शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते म्हणून १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. या शाळेत सावित्रीबाई फुले मुख्याध्यापक म्हणून काम पाहू लागल्या. या शाळेत सुरवातीला दोन मुली होत्या वर्षअखेर या शाळेतील मुलींची संख्या ४० ते ४५ पर्यंत पोहचली. या शाळेमुळे शूद्र समजल्या जाणाऱ्या स्त्री वर्गास ज्ञानाची कवाडे खुली झाली. पण हे चांगले काम त्याकाळातील सनातनी वर्गास रुचले नाही. मुली शाळेसाठी घराबाहेर पडू लागल्याने धर्म बुडाला अशी आरोळी ठोकत या सनातनी लोकांनी सावित्रीबाई व जोतीरावांच्या या महान कार्यास विरोध केला. सावित्रीबाई फुले यांच्या अंगावर शेण गोळे फेकले. काहींनी तर अंगावर हात टाकण्याचाही प्रयत्न केला पण फुले दांपत्य डगमगले नाही. घेतलेला वसा त्यांनी सोडला नाही. कितीही विरोध झाला तरी ध्येयापासून ते विचलित झाले नाही. जिद्दी व ध्येयवादी फुले दांपत्यांनी ज्ञानदानाचे आपले पवित्र कार्य चालूच ठेवले. जोतिरावांनी काढलेल्या शाळेत फुले दांपत्य व अन्य शिक्षक जीव ओतून शिकवत. विद्यार्थ्यांशी ते एकरूप होत त्यामुळे त्यांच्या शाळेची प्रगती लक्षणीय होती. त्यांच्या शाळेविषयी पुणे ऑब्जर्व्हर या दैनिकामध्ये २१ मे १८५२ मध्ये लिहिले होते, जोतीराव फुलेंच्या शाळेतील मुलींची संख्या सरकारी शाळेतील मुलांच्या संख्येपेक्षा दहा पटीने जास्त आहे कारण या शाळेत मुलींना शिकवण्याची जी व्यवस्था आहे ती मुलांच्या शासकीय शाळेपेक्षा चांगली आहे. १८६३ मध्ये फुले दांपत्यांनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. सावित्रीबाई त्याच्या प्रमुख होत्या. १८८५ पर्यंत ३५ विधवा ब्राह्मण स्त्रिया त्यांच्याकडे आल्या. त्यांची बाळंतपणे सावित्रीबाईंनी केली. १८७४ साली काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवा त्यांच्या घरात आल्या. या काशीबाईच्या मुलाला त्यांनी दत्तक घेतले त्या मुलाचे नाव यशवंत ठेवले. यशवंतला शिकवून त्यांनी डॉक्टर बनवले. सण १८७७ साली महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला. या दुष्काळात फुले दांपत्यांनी लोकांना खूप मदत केली. त्यांनी दुष्काळग्रस्तांसाठी जेवणाखाण्याची सोय केली. सावित्रीबाईंनी केशवपन पद्धत बंद करण्यासाठी नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन करुन नाभिकांचा संप घडवून आणला. पुनर्विवाहाचा कायदा व्हावा यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. महात्मा फुलेंनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाची धुरा त्यांनी समर्थपणे वाहिली. सावित्रीबाई फुले या मोठ्या साहित्यिकही होत्या. काव्यफुले व बावनकशी सुबोध रत्नाकर हे काव्यसंग्रह त्यांनी लिहिले. १८९६-९७ साली पुण्यात प्लेगने धुमाकूळ घातला होता. प्लेग या जीवघेण्या आजाराने अनेकांचा जीव घेतला. हा रोग संसर्गजन्य आहे हे माहीत असूनही सावित्रीबाईंनी प्लेग पीडितांसाठी पुण्याजवळ दवाखाना सुरू केला. त्या रोग्यांची सेवा करु लागल्या. त्यांना आधार देऊ लागल्या. प्लेगच्या रोग्यांची सेवा करताना सावित्रीबाईंनाही प्लेगची लागण झाली त्यातून १० मार्च १८९७ रोजी त्यांचे निधन झाले. सावित्रीबाई फुले यांचे कार्य समस्त मानवजातीला भूषणावह आहे म्हणूनच जयंतीदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

# छगन भुजबळ परदेशातून येताच चर्चांना उधाण, शरद पवारांसोबत कार्यक्रमात जाणार

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी** : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार छगन भुजबळ सावित्रीबाई फुलेंच्या जयंतीच्या निमित्ताने पुण्यात एकाच मंचावर येणार आहेत. पुणे जिल्ह्यातील चाकण कृषी उत्पन्न बाजार समितीत सावित्रीबाई फुलेंच्या पुतळ्याच्या अनावरणासाठी हे नेते उद्या (शुक्रवारी) चार वाजता एकत्र येणार आहेत. या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे आंबेगावचे आमदार दिलीप वळसे पाटील यांनाही आमंत्रण देण्यात आलं आहे. या कार्यक्रमासाठी खासदार अमोल कोल्हे यांनी पुढाकार घेतला असल्याची माहिती आहे.

काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील यांच्यासह अन्य बड्या नेत्यांनी अजित पवारांच्या सोबत जाण्याचा निर्णय घेतला. पक्षात फूट पडल्यानंतर हे नेते शरद पवारांच्या सोबत कुठल्या कार्यक्रमाला दिसलेले नव्हते, मात्र उद्या सावित्रीबाई फुले यांची जयंती आहे, या निमित्ताने शरद पवार, छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील एका मंचावरती येणार असल्याची चर्चा होताना दिसत आहे. दरम्यान काही दिवसांपासून छगन भुजबळ नाराज असल्याच्या चर्चामुळे या भेटीकडे सर्वांच्या नजरा लागलेल्या आहेत. त्याचबरोबर गेल्या काही दिवसांपासून भुजबळ नाराज असल्याच्या वेगळा निर्णय घेणार असल्याच्या चर्चा सुरू होत्या, महायुती सरकारच्या मंत्रिमंडळामध्ये छगन भुजबळ यांना स्थान मिळालेले नाही, त्यानंतर त्यांनी अजित पवारांवरती थेट टीका केली आणि तरी देखील अजित पवार यांनी त्यांच्या नाराजीबाबत अद्याप कोणतंही स्पष्टीकरण दिलेलं नसल्याची चर्चा होती, त्यानंतर छगन भुजबळ परदेशात गेले होते, आज ते पुन्हा भारतात परतत आहेत. उद्या शरद पवार आणि छगन भुजबळ एकत्र एका मंचावरती दिसणार आहेत, त्यामुळे ते सर्वांच्या चर्चेचा विषय ठरला आहे.



दरम्यान सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचा पहिला कार्यक्रम हा सातारा जिल्ह्यातील नायगाव या ठिकाणी आहे, या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, राज्य मंत्रिमंडळातील अनेक मंत्री देखील उपस्थित राहणार आहेत, त्याच वेळी तिथे छगन भुजबळ देखील उपस्थित राहणार आहे. मात्र, तो कार्यक्रम झाल्यानंतर छगन भुजबळ हे शरद पवार यांच्या सोबतच्या दुसऱ्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. या ठिकाणी छगन भुजबळ शरद पवार काय बोलतात याकडे सर्वांचे लक्ष लागलेलं आहे.

## खोटं बोलून, माझ्या नावाने बिझनेस करु नका' अंकिता वालावलकर संतापली

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबई : बिग बॉस मराठी ५ सीझनमधील स्पर्धक सोशल मीडियावर प्रचंड सक्रिय असतात. आपल्या कामाविषयी आणि लाइफ रिलेटेड अपडेट ते चाहत्यांसोबत शेअर करत असतात. बिग बॉसमधून बाहेर पडल्यापासून कोकण हार्टेड गर्ल म्हणजेच अंकिता वालावलकरची लग्नघाई सुरू आहे. ती सोशल मीडियाच्या माध्यमातून तिच्या लग्नाचे अपडेट देत असते. अशातच अंकिताचं नाव वापरून बिझनेस केला जात असल्याचं समोर आलं. यामुळं अंकिता भडकली आहे. अंकिता वालावलकरच्या नावाचा वापर करून एक सोशल मीडिया पेज प्रसिद्धी आणि बिझनेस मिळवत असल्याचा समोर आलं. हे प्रकरण समजताच अंकिता खूप भडकली आहे. अंकिताने अशा लोकांचा समाचार घेतल्याचं समोर आलंय. 'किर्ती आर्ट अँड क्राफ्ट' नावाच्या एक इन्स्टाग्रामवर पेज आहे. या पेजवर मुंडावळ्यांचा एक व्हिडिओ शेअर करत अंकिताने तिच्या लग्नासाठी हे बनवून घेतल्याचं सांगितलं. हा व्हिडिओ व्हायरल होताच अंकिताने यावर कमेंट करत समाचार घेतला. अंकिता म्हणाली, मी फक्त एवढंच सांगेन की, छान व्यवसाय करा, पण खोटं बोलून करू नका. मला खोटं बोलून, माझं नाव वापरून व्यवसाय केलेला आवडणार नाही. मी तुमच्याकडून मुंडावळ्या घेतलेल्या नाहीत. जे आमच्या लग्नासाठी खरंच मेहनत करत आहेत, त्यांना क्रेडिट मिळू द्या. दरम्यान, अंकिता वालावलकर आणि कुणाल भगत यांच्या लग्नाची चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून सुरू होती. मात्र अखेर आता त्यांची लग्नपत्रिका समोर आली असून लवकरच त्यांची लग्नघाई सुरू होईल. अंकिताचा होणारा नवरा कुणाल हा गायक, लेखक आणि संगीत दिग्दर्शक आहे. अनेक मराठी मालिकांसाठी त्याने काम केलं आहे. कुणाल हा देखील कोकणातील माणगाव येथील आहे. अंकिता आणि कुणाल यांनी 'आनंदवारी' हे गाणं एकत्र केलं होतं. दोघे अनेक वर्षांपासून एकमेकांना ओळख होते.




## नक्षलवाद्यांच्या गडात जवानांनी ठोकला तळ ; कोरागुट्टातील २५ वर्षापासून बंद रस्ता केला सुरु

दैनिक आपला विदर्भ

रायपूर: महाराष्ट्राच्या सीमेला लागून असलेल्या छत्तीसगडच्या कोरागुट्टा या नक्षलवाद्यांच्या गडात जवानांनी आपला तळ ठोकला आहे. जवानांनी कोरागुट्टा या नक्षलवाद्यांच्या गडाट ३१ डिसेंबरला नवीन कँप उघडून नवीन वर्षाची सुरुवात जल्लोषात केली. जवानांनी मागील २५ वर्षापासून बंद असलेला विजापूर तारेम कोंडापल्ली पामेड हा रस्ता मोकळा केला आहे. कोरागुट्टा हा परिसर नक्षलवाद्यांच्या पीएलजीए बटालियनच्या मुख्य भागात येते. त्यामुळे सुरक्षा दलातील जवानांनी कोरागुट्टा परिसरात तळ ठोकल्यानं हे मोठं यश मानलं जात आहे.

कोरागुट्टा नक्षलवाद्यांच्या पीएलजीए बटालियन क्रमांकचे मुख्य क्षेत्र : सुरक्षा दलातील जवानांकडून सध्या बस्तरमध्ये मोठी कारवाई करण्यात येत आहे. २०२६ ची तयारी सुरू होणार आहे. नवीन वर्षाच्या दिवशी विजापूरमधील नक्षलद्यांच्या पीएलजीए बटालियन क्रमांक १ चे मुख्य क्षेत्र कोरागुट्टा इथं सुरक्षा दलांचा कॅम्प उघडण्यात आला आहे. त्यामुळे या परिसरात सुरक्षा दलाच्या जवानांसह सामान्य नागरिकांनाही जाणं धोकादायक होतं. मात्र आता सुरक्षा दलाच्या जवानांनी थेट कोरोगुट्टा इथंच आपला तळ ठोकला आहे.

२५ वर्षापासून बंद रस्ता नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी केला मोकळा : कोरागुट्टा इथं ३१ डिसेंबरला नवीन कँपची स्थापना करण्यात आली. नक्षलवाद्यांचा गड मानल्या जाणाऱ्या कोरागुट्टा इथल्या कँपमुळे २५ वर्षापासून बंद असलेल्या विजापूर-तारेम-कोंडापल्ली-पामेड रस्त्यावरील वाहतूक पूर्ववत झाली. कोरागुट्टा हे नक्षलवाद्यांच्या पीएलजीए बटालियनच्या मुख्य भागात येते. छत्तीसगड सरकारच्या नियाद नेल्लानार योजनेंतर्गत इथं शिबिराची स्थापना करण्यात आली.







DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# जिल्हा ग्रंथालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमाचे उद्घाटन





दैनिक आपला विदर्भ

## वाचनीय ग्रंथांच्या मेजवानीचा वाचकांनी लाभ घ्यावा

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय येथे 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या शासनाच्या अभिनव उपक्रमाअंतर्गत भव्य ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. ग्रंथ प्रदर्शनात अमूल्य वाचनीय ग्रंथांची मेजवानी वाचकांसाठी उपलब्ध असून या ग्रंथ प्रदर्शनाचा जास्तीत जास्त वाचनप्रेमी, विद्यार्थी यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी केले.

या कार्यक्रमाला प्र. जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड, अप्पर कोषागार अधिकारी बबन इटे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील पाटील, मॉडेल डिग्री कॉलेजचे प्राचार्य डॉ. अण्णासाहेब म्हळसने, जिल्हा ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष डॉ. की.वा. वाघ, माहिती सहायक सतीश बगमारे, जिल्हा कोषागार कार्यालयाचे सहायक लेखाधिकारी श्याम जाधव तसेच मोठ्या प्रमाणात वाचक, स्पर्धा परीक्षा विद्यार्थी, शासनमान्य ग्रंथालयांचे पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

अलिकडच्या काळात देशाची तरूण पिढी वाचन संस्कृतीपासुन दुरावत असल्याचे दिसत आहे. या पिढीला प्रत्यक्ष ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करण्यासाठी दि. १ ते १५ जानेवारी या कालावधीत 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रम राबविण्यात येत आहे. या अभिनव उपक्रमांतर्गत जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय येथे ग्रंथप्रदर्शन, सामुहिक वाचन, वाचन कौशल्य कार्यशाळा, वाचन संवाद, पुस्तक परीक्षण व कथन अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांमध्येही वाचन पंधरवडा राबविण्यात येणार आहे.

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे सुमारे १ लक्ष ६० हजार ग्रंथसंपदा उपलब्ध असून त्यामध्ये मराठी, इंग्रजी व हिंदी भाषेतील विविधांगी कथासंग्रह, कादंबरी, संदर्भग्रंथ, ललित वाङःमय, स्पर्धा परीक्षा ग्रंथ इत्यादी ग्रंथसंपदा उपलब्ध असून वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमामध्ये जास्तीतजास्त वाचकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील पाटील यांनी केले आहे.

## महत्त्वाचे...

### जालन्यात १ ते ३१ जानेवारी दरम्यान राज्य रस्ता सुरक्षा अभियान; आज रस्ता सुरक्षा रथ आणि रॅलीचे उद्घाटन संपन्न




दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालन्यात राज्य रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येत आहे. १ ते ३१ जानेवारी दरम्यान हे अभियान होणार आहे. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय जालनाच्या वतीने आयोजित अभियान रस्ता सुरक्षा रथ आणि रॅलीचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि जिल्हा पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आले. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, महानगरपालिका उपायुक्त नंदा गायकवाड स्वामी विवेकानंद स्पर्धा परीक्षा प्रबोधीनीचे संचालक सुधीर हजारे यांची प्रमुख उपस्थिती होती. या रॅलीला जिल्हाधिकारी कार्यालयापासून सुरुवात होऊन मोती बाग, औरंगाबाद चोफुली मार्गे उप प्रदेशिक परिवहन कार्यालय येथे रॅलीचा समारोप करण्यात आला.

### दोन मित्रांनी दारूच्या नशेत केली आई व मुलाची हत्या; २४ तासात आरोपींना अटक





दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबईतील कामोठे सेक्टर ६ मधील ड्रीम्ज आपार्टमेन्ट मध्ये दोघांची हत्या झाल्याचा प्रकार समोर आला आहे. घरात आई आणि मुलाचा मृतदेह मिळाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली होती. दरम्यान या घटनेचा पोलिसांनी अधिक तपास केला असता, ३१ डिसेंबरची पार्टी करण्यासाठी घरी आलेल्या दोन मित्रांनीच हत्या केल्याचे समोर आलं आहे. नशेमध्ये असताना मित्रांमध्ये वाद झाला आणि या वादातूनच आई आणि मुलाची हत्या करण्यात आली तर अवघ्या २४ तासामध्ये पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेतले असून सध्या आरोपींना पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

### घाटकोपर पोलिसांनी लाखो रुपयांचे चोरीला गेलेले मोबाईल मुळ मालकांना केले परत



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** नववर्ष स्वागत आणि पोलीस रायझिंग डे चे औचित्य साधून आज घाटकोपर मध्ये मुंबई पोलिसांनी लाखो रुपयांचे मोबाईल मूळ मालकांना परत केले. गेल्या वर्ष भरात घाटकोपर पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरीला गेलेले अथवा हरवलेले सुमारे तीनशे मोबाईल ज्याची किंमत ३८ लाख रुपये इतकी आहे हे मोबाईल अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून हस्तगत केले होते. गुजरात, उत्तर प्रदेश, झारखंड, बिहार, पश्र्चिम अश्या विविध राज्यातून विशेष पथकाने तपास करून हे मोबाईल परत मिळविले होते. परिमंडळ सात चे उपायुक्त विजयकांत सागर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश काळदाते, पोलीस निरीक्षक दिपाली कुलकर्णी यांच्या हस्ते हे मोबाईल आज मूळ मालकांना परत करण्यात आले. या वेळी उपायुक्तांनी नागरिकांना आपल्या मोबाईलची काळजी कशी घ्यावी, मोबाईल चोरीला गेल्यास काय करावे या बाबत मार्गदर्शन ही केले.पोलिसांनी आपल्याला नव्या वर्षाचे हे गिफ्ट दिल्याबद्दल नागरिकांनी ही पोलिसांचे आभार मानले.

### ऑस्ट्रेलियाकडून ३१ वर्षीय खेळाडू सिडनी कसोटीत करणार पदार्पण

नवी दिल्ली :बॉर्डर गावस्कर ट्रॉफीच्या अखेरच्या कसोटी सामन्यासाठी ऑस्ट्रेलियाने आपल्या प्लेइंग इलेव्हनची घोषणा केली आहे. सिडनी कसोटीसाठी ऑस्ट्रेलियाने संघात मोठा बदल केला आहे. त्यांनी फॉर्मात नसलेल्या अष्टपैलू मिचेल मार्शला संघातून वगळले आहे. ऑस्ट्रेलियन कर्णधार पॅट कमिन्सने संघाची घोषणा करताना वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कबाबतही अपडेटही दिले आहेत.

# व्हॉट्स ॲप, टेलिग्राम आणि इन्स्टाग्रामचा सायबर फसवणुकीसाठी सर्वाधिक वापर

नवी दिल्ली : तुमच्या फोनवर व्हॉट्स ॲप, टेलिग्राम आणि इन्स्टाग्राम असल्यास तुम्हाला सावध राहण्याची गरज आहे. या ॲप्सच्या माध्यमातून सायबर ठग लोकांना सर्वाधिक टार्गेट करत असल्याचं गृह मंत्रालयाच्या अहवालातून समोर आलं आहे. वास्तविक, या तिन्ही ॲप्सचे करोडो वापरकर्ते आहेत. या ॲप्सचा वापर नागरिक दररोज मोठ्या संख्येनं करतात. त्यामुळं, ऑनलाइन फसवणूक करणारे ठग या ॲप्सचा वापर करून नागरिकांना चुना लावताय.

व्हॉट्स ॲपच्या माध्यमातून सर्वाधिक फसवणूक : सर्वाधिक फसवणूक व्हॉट्सॲपच्या माध्यमातून होत आहे. २०२४ च्या पहिल्या तीन महिन्यांत सरकारला व्हॉट्स ॲपद्वारे सायबर फसवणुकीच्या सर्वाधिक ४३ हजार ७९७ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. यानंतर टेलिग्रामच्या माध्यमातून फसवणुकीच्या २२ हजार ६८० तक्रारी आणि इन्स्टाग्रामद्वारे फसवणुकीच्या १९,८०० तक्रारी आल्या. रिपोर्टमध्ये असं म्हटलं आहे की, सायबर ठग गुगल सर्व्हिस प्लॅटफॉर्मचा वापर करून असे गुन्हे करतात. त्यांच्या मदतीनं ते लोकांना लक्ष्य करतात.

'या' लोकांना सर्वाधिक केले जात टार्गेट : देशातील सायबर फसवणुकीच्या वाढत्या प्रकरणांदरम्यान आलेल्या गृह मंत्रालयाच्या या वार्षिक अहवालात असं म्हटलं आहे की अशा प्रकारची फसवणूक वेगवेगळ्या देशांमध्ये होत आहे. त्यात मोठ्या प्रमाणावर मनी लॉंडरिंग आणि सायबर गुलामगिरीचाही समावेश आहे. बेरोजगार तरुण, गृहिणी, विद्यार्थी आणि इतर गरजू लोकांना सायबर फसवणुकीत सर्वाधिक लक्ष्य केलं जातंय. कर्ज घेतलेल्या पैशांचाही या पैशात समावेश आहे.

# नववर्षाच्या शुभेच्छा देण्यासाठी शिक्षकाने रेखाटले फलकावरती अनोखे चित्र




दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिक मधील चांदवड तालुक्यातील शिक्षण मंडळ भगूर संचलिक नुतन माध्यमिक विद्यालय भाटगांव येथील शिक्षक देव हिरे यांनी नववर्षाच्या स्वागतासाठी शाळेतील फलकावर एक आकर्षक चित्र रेखाटले आहे. येणाऱ्या नवीन वर्षाच्या शुभेच्छा या सर्व सामान्य लोकांपर्यंत पोहचाव्या. या फलक रेखाटनामध्ये शेतकरी वर्ग ऊसतोड मजूर यांच्या समस्या या भयंकर वाईट आहेत यांना एक आशा असते त्यांचा उद्याचा येणार दिवस निश्र्चित चांगला येईल या आशेवर ते कष्ट करत असतात आणि त्यांचा प्रत्येक दिवस हा नवीन वर्षासारखा असतो पुन्हा सुर्य उद्या नवीन उगवेल आणि आपले भोग आहे ते भोग नष्ट होतील अशा आशेने ते नेहमीच कष्ट करत असतात,'' दिस जातील, दिस येतील. भोग सरंल, सुख येईल '' आशा भोसले आणि सुरेश वाडकर यांनी गायलेल्या या गाण्याच्या दोन लाईन देते शेतकऱ्यांच्या व्यस्था समजून हे चित्र रेखाटले आहे. फलक रेखाटनातून मुलांना प्रत्येक दिनविशेष समाजावं, विविध गोष्टींच ज्ञान मिळावं यासाठी हे शिक्षण अनेक चित्र रेखाटत असतात, चित्राच्या माध्यातून देशातील संस्कृती, इतिहास मुलांना कळावा या मागचा उद्देश असल्याचे देव हिरे यांनी सांगितले.

### नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच गोवंशाची कत्तल करणाऱ्यांवर छ. संभाजीनगर पोलिसांची कारवाई



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** पोलिसांनी छ. संभाजीनगर शहरामध्ये सिल्लेखाना परिसरात कसायाच्या गोठ्या मधून ९४ गाई जप्त केल्या आहेत. पोलीस उपायुक्त संपत शिंदे यांनी पहाटे तीन वाजता सिल्लेखाना भागामध्ये चार ते पाच गोठ्यांवर कारवाई करत ९४ जातींची जनावरे जप्त केली आहेत. ही शहरातील आतापर्यंतची मोठी कारवाई समजली जाते. आम्हाला विश्वसनीय खबऱ्यांमार्फत माहिती मिळाली की या भागामध्ये गोवंश कत्तलीसाठी आणण्यात आले आहेत या माहितीवरुन आम्ही या भागांमध्ये तपास केला असता चार गोठ्यांमधून लहान मोठे असे ९४ गोवंश आढळून आले. ते महानगरपालिकेच्या कोणवाडा विभागाच्या ताब्यात देण्यात आले आहे अशी माहिती एसीपी शिंदे यांनी दिली आहे.

### जम्मू काश्मीरच्या साईभक्ताकडून पत्नीच्या इच्छेसाठी साईचरणी १३ लाखांचा सुवर्णहार अर्पण

**शिर्डी/प्रतिनिधी :** श्रद्धा - सबुरीचा महामंत्र देणाऱ्या शिर्डीतील साईबाबांचे मंदिर देश-विदेशातील करोडो भाविकांचे श्रद्धास्थान बनले आहे. याच श्रद्धेपोटी भाविक साईबाबांच्या झोळीत भरभरून दान देतात. नवीन वर्षा निमित्तानंदेखील साईभक्तांनी भरभरून दिले आहे. मागील शनिवार आणि रविवार या दोन दिवसात तब्बल दोन कोटींचे दान भाविकांनी साईचरणी अर्पण केलय. यामध्ये जम्मू काश्मीरच्या जोडप्यानं १३ लाखांचा सोन्याचा हार साईचरणी अर्पण केला आहे. मूळचे जम्मू काश्मिर येथील रहिवासी असलेले टिकू परिवाराची शिर्डी साईबाबांवर प्रचंड श्रद्धा आहे. गेल्या काही दिवसांपासून बबिता टिकू या शिर्डीत स्थायिक झाल्या आहेत. तर त्यांचे पती नवीन टिकू हे व्यवसायासाठी दिल्लीत असतात. खूप वर्षापासून साईबाबांना काही तरी भेटवस्तू देण्याची त्यांच्या पत्नीची इच्छा होती. पत्नीचा इच्छेचा मान ठेवत त्यांनी नवीन वर्षा निमित्तानं शिर्डी साईबाबा संस्थानला तब्बल २०६ ग्रॅम वजनाचा आणि १३ लाख ३० हजार ३४८ रुपये किमतीचा सोन्याचा हार भेट स्वरुपात दिला.

# कारागृहातील बंद्यांकरिता ई-मुलाखत सुविधा; नातेवाईक, वकीलांनी ऑनलाईन सुविधेचा लाभ घेण्याचा आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बंदी कारागृहात दाखल झाल्यानंतर त्याचा बाहेरील जगाशी व नातेवाईक यांचेशी संपर्क तुटून जातो. बंद्यांच्या नातेवाईकासोबत संपर्क साधता यावा, यासाठी बुलढाणा कारागृहामार्फत नातेवाईक व वकील यांना व्हर्चुअल पद्धतीने घरुनच मोबाईलचा वापर करून व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घरबसल्या भेट घेण्याची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. या ई-मुलाखत सुविधेचा लाभ बुलढाणा जिल्हा कारागृहात बंदीस्त असलेल्या बंद्यांच्या नातेवाईकांनी तसेच वकीलांनी घ्यावा, असे आवाहन बुलढाणा जिल्हा कारागृहाचे अधीक्षक संदीप भुतेकर यांनी केलेले आहे.

कारागृहात दाखल झालेल्या बंद्यासाठी त्यांच्या नातेवाइकांसोबत संपर्क साधण्यासाठी कारागृह प्रशासनाकडून वेगवेगळ्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात. त्यापैकीच एक म्हणजे मुलाखत सुविधा. यामध्ये बंद्याचे नातेवाईक व वकील यांना कारागृहात प्रत्यक्ष मुलाखत घेता येते. आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात कारागृह विभागानेसुद्धा माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन कारागृहात बंद्याचे नातेवाईक व वकील यांना व्हर्चुअल पद्धतीने घरुनच मोबाईलचा वापर करून व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. बुलढाणा जिल्हा कारागृहातील बंद्यांना त्यांचे नातेवाईक व वकील यांचेकरीता भेटीसाठी कारागृहात दोन व्हिडीओ कॉन्फरन्सिंग संच उपलब्ध असून आवश्यकतेनुसार व्हीसी संचांची संख्या वाढविण्यात येणार आहे.

यापुर्वी बंद्यांचे कारागृहातील प्रत्यक्ष मुलाखतीकरीता चार खिडक्या उपलब्ध होत्या. आता जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून नव्याने मुलाखत कक्ष बांधण्यात आलेला असून यात १० खिडक्यांद्वारे बंदी त्यांचे नातेवाईक व वकील यांचेशी प्रत्यक्ष भेट घेऊ शकतात. तसेच कारागृह प्रशासनाकडून बंद्यासाठी दूरध्वनी सुविधाही उपलब्ध करुन देण्यात आले असून बंद्यांच्या नातेवाईकांचे व्हेरीफाईड मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू शकतात. कारागृहात असलेले विदेशी बंदी, कारागृहातील भारतीय बंदी ज्यांचे नातेवाईक विदेशात राहतात त्यांच्यासह सर्व बंद्यांना या सुविधेचा लाभ मिळतो. सद्यस्थितीत पाकीस्तानी बंद्यांना हि सुविधा लागू नाही.

नातेवाईक व वकील हे NPIP (www.eprisons.nic.in/npip) या पोर्टलवरुन स्वतःची व बंद्याची माहिती नमुद करुन कारागृहाला व्हीसी भेटीसाठी ऑनलाईन विनंती करु शकतात. पात्र नातेवाईक व वकील यांना कारागृहाकडून व्हीसी मुलाखतीला मान्यता मिळाल्यानंतर त्यांच्या नमुद ई-मेलवर व्हीसी भेटीची वेळ व दिनांक निश्र्चीत केल्यानंतर बंद्याला कारागृहातून व्हीसीद्वारे उपस्थित ठेऊन बंदी व त्याचे नातेवाईक, वकील यांच्याशी ई-मुलाखत केली जाते.

व्हीसी मुलाखतीमुळे बंद्याचे नातेवाईक व वकील यांचे वेळ, श्रम व पैशाची बचत होणार आहे. आजारी व वयस्कर नातेवाईक तसेच लहान मुले यांना प्रत्यक्ष मुलाखतीस येण्याची दगदग न होता घरबसल्या मुलाखत घेणे शक्य होईल. जिल्हा, परराज्यातील किंवा विदेशातील नातेवाईक यांना घरुन मुलाखत घेता येत असल्यामुळे त्यांचा होणारा त्रास कमी होणार आहे. तसेच प्रत्यक्ष कारागृहात मुलाखतीकरीता येणारे नातेवाईक व वकील यांची संख्या कमी होऊन प्रशासनाला मदत होणार आहे. ई-मुलाखत सुविधेचा जास्तीत जास्त वापर व्हावा या करीता कारागृह प्रशासनाकडून जनजागृती करण्यात येत आहे. यासाठी कारागृह परीसरात व मुलाखत नावनोंदणी कक्षाजवळ माहितीफलक लावण्यात आले आहेत. कारागृह अधीक्षकांच्या साप्ताहीक संचार फेरीदरम्यान सुद्धा बंद्यांना सदर सुविधेची माहिती देऊन नातेवाईक व वकीलांसोबत संवाद साधण्यासाठी प्रेरित करण्यात येत आहे.

# विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक घडविण्यासाठी विज्ञान प्रदर्शनाची गरज - आमदार सिद्धार्थ खरात







दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** विज्ञान प्रदर्शनांच्या माध्यमातूनच विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक घडतील. जिज्ञासू वृत्तीला विज्ञान प्रदर्शनातून प्रोत्साहन मिळेल, असे प्रतिपादन मेहकर विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आ.सिद्धार्थ खरात यांनी केले यांनी केले. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाची आवड निर्माण होऊन त्यांच्यामध्ये संशोधकवृत्ती निर्माण झाली पाहिजे. विज्ञान प्रदर्शनांच्या माध्यमातूनच विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक घडतील. त्यांच्या जिज्ञासू वृत्तीला विज्ञान प्रदर्शनातून प्रोत्साहन मिळेल, असे प्रतिपादन भारतीय ज्ञानपीठ मेहकर येथे आयोजित तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे काल गुरुवार २ जानेवारी रोजी उद्घाटन झाले . उद्घाटक म्हणून यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की विज्ञान प्रदर्शनाचा जीवनातील आव्हानात्मक समस्यांवर वैज्ञानिक उपाय शोधता येतात. त्याचबरोबर मेहकर या ऐतिहासिक नगरीला पूर्वीचे असलेले शैक्षणिक गतवैभव मिळवून देण्यासाठी तालुक्यातील सर्व सरकारी व खाजगी शाळांनी पुढाकार घेऊन अशा पद्धतीने वेळोवेळी विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवण्यासाठी त्यांना विज्ञानाची गोडी निर्माण व्हावी यासाठी तालुकास्तरीय व प्रत्येक गावात विज्ञान प्रदर्शनी आयोजित करणे ही काळाची गरज आहे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. त्याचबरोबर गाव तेथे वाचनालय, अभ्यासिका, विज्ञान शाळा, प्रयोगशाळा ,पुढच्या काळात स्थापन करण्याचा खूप मोठा रोड मॅप तयार केलेला असून येणाऱ्या काळात या तालुक्याला शैक्षणिक नावलौकिक मिळवून देण्यासाठी मी कटिबद्ध आहे. त्यासाठी सर्व शिक्षकांनी जबाबदारीने आता पुढे आलं पाहिजे असे यावेळी ते म्हणाले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विशाल काबरा (सचिव, भारतीय ज्ञानपीठ) उद्घाटक म्हणून आ. सिद्धार्थ खरात हे होते . प्रमुख अतिथी म्हणुन उपजिल्हाप्रमुख आशिष रहाटे, शहर प्रमुख किशोर गारोळे, युवा तालुका प्रमुख आकाश घोडे, गटविकास अधिकारी देशमुख, सहाय्यक गटविकास अधिकारी जाधव,मधुकर वानखडे गटशिक्षणाधिकारी, प्रमोद रायमुलकर गट समन्वय., एस बी काळे शिक्षण विस्तार अधिकारी पं. स., सोळंके विस्ताराधिकारी, सरकटे प्रशासन अधिकारी शिक्षण विभाग, भारतीय ज्ञानपीठ चे संचालक शाम राठी,मोहिते इन्नानी , सर्व शिक्षक संघटनेचे पदाधिकारी त्यामध्ये शिक्षक अरुण बळी, सुधिर मैइदकर,शेख इरफान,पी.सी.पवार, राहुल डोंगरेदिवे , राजेंद्र वाघ ,गरूड, प्रदीप इंगळे, एन.जी.देशमुख , केंद्रप्रमुख मनोहर खरात, इत्यादी सर्व शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह भारतीय ज्ञानपिठ चे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी ,पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार प्रदीप जोशी यांनी केले यावेळी विविध वैज्ञानिकांच्या भूमिकेमध्ये विद्यार्थ्यांची वेशभूषा आकर्षण ठरली . सुरुवातीला ढोल व लेझीम वाजवत विद्यार्थ्यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले.

## भारतीय ज्ञानपीठ मध्ये तालुका विज्ञान प्रदर्शनीचे उद्घाटन आज होणार समारोप व बक्षीस वितरण

## शिक्षणाचे झालेला मातेरे दुर्दैवी..

शिक्षण विभागाच्या काही चुकीच्या धोरणामुळे शिक्षकांना विद्यार्थी घडवण्याच्या ऐवजी इतरच कामे जास्त करावे लागतात त्यामुळे विद्यार्थ्यांकडे वेळप्रसंगी दुर्लक्ष होते. शिक्षण विभागाच्या अनेक धोरणामध्ये बदल करणे गरजेचे आहे. हे बदल करण्यासाठी येणाऱ्या काळात पुरेसा प्रयत्न करणार असल्याचे आ.सिद्धार्थ खरात यांनी यावेळी व्यक्त केले.

## स्व. रतन टाटा व मा. राष्ट्रपती ए.पी.जे अब्दुल कलाम यांना कार्यक्रम समर्पित

या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनी मध्ये स्व रतन टाटा, माजी राष्ट्रपती स्व.एपीजे अब्दुल कलाम यांना हा कार्यक्रम समर्पित करण्यात आला.त्यांचे रांगोळीने काढलेली छायाचित्रे कार्यक्रमाचे आकर्षण ठरले. विद्यार्थ्यांनी आपला वैज्ञानिक दृष्टिकोन वापरून तयार केलेले विज्ञान उपकरणे अतिशय दर्जेदार व नाविन्यपूर्ण होते. त्यामध्ये सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे सुद्धा कौतुक आ. सिद्धार्थ खरात यांनी यावेळी केले.

## विविध वृत्त...

### डुप्लिकेट चावी बनवण्यासाठी आलेला चोरटा पोलिसांच्या जाळ्यात; दहा दुचाक्या जप्त



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील खामगावात डुप्लीकेट चावी बनविण्यासाठी आलेल्या संशयित व्यक्तीस शहर पोलिसांच्या डिबी पथकाने ताब्यात घेऊन त्याची चौकशी केली. चौकशीत त्याने दुचाक्या चोरल्याची कबुली दिली. रूपेंद्र नरसिंह पट्टे राहणार संत रोहिदास नगर मलकापूर हा खामगाव येथील महावीर येथे डुप्लीकेट चावी बनविण्यासाठी आला होता. तिथे असलेल्या असलेल्या डिबी पथकाला त्याच्यावर संशय आला. पोलिसांनी त्याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. पोलिसांनी त्याला पोलीस ठाण्यात आणले. त्यानंतर त्याने चार दुचाकी चोरी केल्याचे कबुल केले आहे. त्यावरून पोलिसांनी त्याच्या ताब्यातून जलंब, नांदुरा, मलकापूर, भुसावळ, मूर्तिजापूर येथून चोरी केलेल्या एकूण १० दुचाक्या जप्त केल्या आहेत. तर त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने रूपेंद्र पट्टे याला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

### धनंजय मुंडेंनी स्वत:हून राजीनामा दिला पाहिजे; कारण.., सुषमा अंधारेंचं वक्तव्य

**मुंबई/प्रतिनिधी :** संतोष देशमुख प्रकरणावरुन फोकस हलायला नको. संतोष देशमुख यांचे मारेकरी आणि हत्येचा मास्टरमाईंड या सगळ्यांना शिक्षा व्हायला पाहिजे अशी मागणी शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारेंनी केली.

# चिमुकल्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून नववर्षाचा प्रारंभ

## डोणगाव अर्बन परिवाराचा उपक्रम

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** नवीन कामाचा प्रारंभ शुभकार्याने करावा,असा पायंडा सर्वश्रुत आहे. याचप्रमाणे डोणगाव अर्बन बँक परिवाराच्या वतीने नवीन वर्षाचा शुभारंभही चिमुकल्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवीत केला आहे. जनसेवा हीच ईश्र्वरसेवा आणि त्यातही गोरगरीब चिमुकल्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून नवीन उपक्रम राबविला आहे. कोणत्याही नवीन कामाचा प्रारंभ हा शुभकार्याने व्हावा हा प्रघात भारतीय संस्कृतीमध्ये आहे. त्यानुसार डोणगाव अर्बन बँक परिवाराच्या वतीने नवीन वर्षाच्या प्रारंभी एक जानेवारीला वरदडा येथील पारधी आश्रम शाळेत भेट देऊन तेथील १३८ चिमुकल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व मिठाई वाटप करून नवीन वर्षाचा प्रारंभ करण्यात आला. डोणगाव अर्बन बँकेचा बँकेने अल्पावधीतच ग्राहकांचा विश्र्वास संपादन करीत व्यावसायिक क्षेत्रात उंची गाठली आहे. कोणतेही कार्य करताना व्यवसायाबरोबर सामाजिक कार्याला प्राधान्य



मिळाल्यास समाजामध्ये त्याची वेगळी प्रतिष्ठा निर्माण होते व आपलेही सामाजिक दायित्व असते, या बाबीची जाण ठेवत डोणगाव अर्बन बँकेच्या वतीने वरदडा येथील पारधी आश्रम




शाळेतील तब्बल १३८ चिमुकल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व मिठाई वाटप करून नवीन वर्षाचा प्रारंभ केला. यावेळी चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर फुललेले स्मितहस्यातून नवीन वर्षात सत्कार सत्कर्म करण्याचे ऊर्जा मिळाल्याचे मत यावेळी डोणगाव अर्बन बँकेचे अध्यक्ष ऋषाक चव्हाण सह पदाधिकारी अभिषेक मानवतकर , अनिल ठोंबरे , आवेज शेख , युवराज पवार यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला शाळेचे शिक्षक वृंदासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती डोणगाव अर्बन बँकेच्या वतीने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाबद्दल डोणगाव अर्बन बँकेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### सामाजिक कार्याने नवी ऊर्जा मिळते

कोणतेही कार्य करताना आपलेही सामाजिक दायित्व राहते. त्यामुळे समाजातील गोरगरीब अथवा गरजूंना सहकार्याची भूमिका नेहमीच डोणगाव अर्बन बँकेची राहिलेली आहे.गोरगरीब जनतेंना मदत झाल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर फुललेले हास्य हे मनाला प्रसन्न करून जाते. केलेल्या कार्याचा यातून आनंद प्राप्त होतो.नवीन वर्षात सुद्धा डोणगाव अर्बन बँक परिवाराचे सामाजिक कार्याला प्राधान्य राहील,नवीन वर्षानिमित्त वरदडा येथील पारधी आश्रम शाळेतील चिमुकल्यांना शैक्षणिक साहित्य व मिठाई वाटप करून एक नवा उपक्रम राबविण्यात आला आहे. चिमुकल्यांना शैक्षणिक साहित्य व मिठाई वाटपानंतर त्यांच्या चेहऱ्यावर फुललेले स्मितहास्याने नवी ऊर्जा प्राप्त झाली असे मत डोणगाव अर्बन बँकेचे अध्यक्ष ऋषांक ओंकारराव चव्हाण यांनी व्यक्त केले.

# निराधार व श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थींनी खाजगी व्यक्तींना पैसे देऊ नयेत - संजय रायमुलकर

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** जानेवारी महिन्यापासून संजय गांधी निराधार आणि श्रावणबाळ योजनेच्या अनुदानाची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होणार असून लाभार्थींनी त्यांची कागदपत्रे तलाठी अथवा तहसील कार्यालयात जमा करावीत.खाजगी व्यक्तींना त्यासाठी पैसे देऊ नयेत ,असे आवाहन माजी आमदार संजय रायमुलकर यांनी केले आहे.



सदर योजनेच्या व्यक्तींच्या बँक खात्यात थेट रक्कम जमा होणार असल्याने त्यासाठी बऱ्याच लाभार्थींनी आधार कार्ड, मोबाईल क्रमांक , बँक खाते पासबुक प्रत महसूल विभागाकडे जमा केलेले नसल्याने येत्या सात दिवसात ते ग्राम महसूल अधिकारी तलाठी , किंवा तहसील कार्यालयात जमा करायचे आहे.यासाठी खाजगी एजेंट सक्रिय होऊन लाभार्थींना पैशाची मागणी करू शकतात.म्हणून खाजगी व्यक्तींना कुणीही पैसे देऊ नयेत,असे आवाहन माजी आमदार संजय रायमुलकर यांनी केले आहे.कुणी अशी रक्कमेची मागणी केल्यास त्याची माहिती शिवसेना कार्यालय मेहकर येथे द्यावी ,असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केला ऑन दि स्पॉट तक्रारीचा निपटारा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे आज बुलडाणा दौऱ्यावर आले असता त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात बसुन नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेतल्या व संबंधित अधिकाऱ्यांना सूचना करून नागरिकांचे प्रश्र्न मार्गी लावले. बुलढाणा लोकसभा मतदारसंघातील मतदारांना येणाऱ्या अडचणी संदर्भात त्यांनी थेट संबंधित अधिकाऱ्यांशी संवाद साधून तक्रारींचा ऑन द स्पॉट निपटारा केला.

या दरम्यान केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात विविध विषयासंदर्भात बैठक घेतली. या बैठकीत शेतकऱ्यांचे प्रश्र्न सोडवून शासनाच्या योजनाची प्रभावी अंमलबजावणी करावी.



वन्यप्राण्यापासून होणाऱ्या पिकांच्या नुकसानीसंदर्भात उपाययोजना करावे. शेतकऱ्यांचे विज प्रश्र्न मार्गी लावण्यासाठी सौर उर्जा प्रकल्पाना गती द्यावी. शासकीय जमीनीवर फळबाग लागवड, शेततळे निर्माण करुन शासनाच्या उत्पन्नात वाढ करण्यासंदर्भात नियोजन करावे. मानव व वन्यप्राणी संघर्ष टाळण्यासाठी झटका मशीन उपलब्ध करुन द्यावे. त्यासाठी शेतकऱ्याचे सामूहिक अर्ज स्विकारुन त्यांना झटका मशिन उपलब्ध करुन द्यावे, आदी निर्देश यावेळी दिले. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील,मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, वन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.